SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Stat Cell : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२२-२३/ 48 दिनांक : 02/03/2024

**स्मरणपत्र क्रमांक ३**

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०२२-२३**
Web DCF मध्ये माहिती भरण्याबाबत...

**संदर्भ :** **१) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२२-२३/४७, दि. २२/०२/२०२४ रोजीचे या कक्षाचे स्मरणपत्र क्रमांक २.**
**२) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२२-२३/४६, दि. १५/०२/२०२४ रोजीचे या कक्षाचे स्मरणपत्र क्रमांक १.**
**३) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२२-२३/४०, दि. २३/०१/२०२४ रोजीचे या कक्षाचे परिपत्रक.**
**४) मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रं. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२२-२३ दि.२६/११/२०२२ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०२२-२३ वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत कळविलेले आहे. सदर वेबपोर्टलवर (www.aishe.gov.in) माहिती नोंद करण्याची सुरवात दिनांक ०५/०१/२०२४ पासुन झालेली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक, व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०२२-२३ करीता माहिती नोंद करावयाची आहे. सदरची माहिती दिनांक १५/०२/२०२४, दिनांक २०/०२/२०२४ व दिनांक २६/०२/२०२४ पर्यंत माहिती नोंदणीचे काम संलग्नित महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी निश्चितपणे पूर्ण करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व ३ अन्वये आपल्याला कळविण्यात आलेले होते.

सदर माहितीचा आढावा घेतला असता आपल्या महाविद्यालयाची माहिती वेबपोर्टलवर अद्याप नोंद केलेली दिसुन येत नाही. **मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे** यांच्या कार्यालयाकडून सदर वेबपोर्टलवर माहिती नोंदविण्याची **अंतिम मुदत दिनांक ०५/०३/२०२४ पर्यंत देण्यात आलेली आहे. दिलेल्या मुदतीपूर्वी माहिती नोंद न केल्यास आपले महाविद्यालय अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) या** वेबपोर्टेलवरून **De-affiliate** होईल. आपले महाविद्यालय De-affiliate झाल्यास या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयाशी निगडीत विद्यापीठातील, विभागीय सहसंचालक कार्यालयातील तसेच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती बाबतचे कोणतेही काम करता येणार नाही. आपले महाविद्यालय (AISHE) या वेबपोर्टेलवरून De-affiliate झाल्यामुळे उद्भवनाऱ्या अडचणीस व पुढील सर्व कार्यवाहीस आपले महाविद्यालय जबाबदार असेल याची कृपया आपण नोंद घ्यावी.

**वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**